महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

# नियामक मंडळाची १६ वी बैठक दि.१६.०३.९९

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मा. मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची १६ वी बैठक दि.१६.०३.९९ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आले.

ठराव क्र. १६/१

''ठराव करण्यात येतो की १५ व्या बैठकीमध्ये पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १६/२

''ठराव करण्यात येतो की, परिशिष्ट क्र.२ मधील बिगर सिंचन पाणी पुरवठा मिळण्याबाबतच्या ३० योजनांचे प्रस्तावांना, सदर प्रस्तावांचा पाणीवापर संबंधित प्रकल्पाच्या सुधारित जलनियोजनामध्ये समाविष्ट केला जाईल व दोन महिन्यांच्या पाणीपट्टीएवढी अनामत रक्कम महामंडळाकडे पाणीवापर करणारी संस्था भरेल. तसेच १९९० च्या शासन निर्णयानुसार आवश्यक तो साठा (storage) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्वखर्चाने करील, या अटींवर नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १६/३

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील प्रकल्पांसाठी सामाजिक व आर्थिक बाबींचा अभ्यास 'मिटकॉन, पुणे' या संस्थेकडून करुन घेण्यास मान्यता देण्यात येत असून, त्याबाबत त्या संस्थेस सोपवायच्या कामाची व्याप्ती व त्याबद्दलचा देय मोबदल्याबाबत पुढील बैठकीत निर्णय घेण्यात येईल.''

ठराव क्र. १६/४

''ठराव करण्यात येतो की,

१. महामंडळाकडील सर्व कर्मचाऱ्यांची रु.२०,००० पेक्षा जास्त खर्चाची आपत्कालीन उपचारांची वैद्यकीय देयके अदा करण्याबाबत वैद्यकीय सल्ला व शिफारस देण्यासाठी ससून सर्वोपचार रुग्णालय येथील खालील वर्ग-१ वैद्यकीय अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

   १. स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ
   २. अस्थिव्यंगोपचारशास्त्र तज्ञ
   ३. शल्यचिकित्साशास्त्र तज्ञ

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
DIR_MEET_16_resolution



कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

४. औषधवैद्यकशास्त्र तज्ञ

५. नेत्रतज्ञ

२. वैद्यकीय समितीने दिलेल्या सल्ल्यानुसार व शिफारशींप्रमाणे रु.२०,००० पेक्षा जास्त खर्चाची आपत्कालीन उपचारांची वैद्यकीय देयके मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र. १६/५

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील ज्या प्रकल्पांचे जलाशयांवर ठिबक सिंचनाद्वारे उपसा परवाने देण्याचे क्षेत्र २८.०४.८९ च्या शासन निर्णय विचारात घेता शिल्लक आहे. तसेच २५.०९.७५ च्या शासन निर्णयानुसार कालव्यांवरील उपसा परवाने देण्याचे क्षेत्र संपलेले आहे, अशा प्रकल्पांच्या जलाशयावरील ठिबक सिंचनासाठी शिल्लक राहिलेल्या क्षेत्रातून प्रकल्पीय सिंचन क्षेत्राच्या १% मर्यादेपर्यंतचे क्षेत्र, सदर प्रकल्पांच्या कालव्यांवरील उपसा क्षेत्रात वर्ग करण्यास व अशा वर्ग केलेल्या क्षेत्रामधून फक्त फळझाडांसाठी ठिबक योजनेद्वारे सिंचनासाठी उपसा परवाने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. अशा परवान्यांसाठी दि.२८.०४.८९ च्या शासन निर्णयातील अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील.''

ठराव क्र. १६/६

''ठराव करण्यात येतो की, सीना-कोळेगांव पाटबंधारे प्रकल्प ता.परांडा, जि.उस्मानाबाद या प्रकल्पाच्या जलाशयाचे 'कल्याणसागर' असे नामकरण करण्याची शिफारस शासनाकडे करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१६/७

''ठराव करण्यात येतो की,

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यक्षेत्रात सोबतच्या परिशिष्ट क्र.१ ते ७ मध्ये प्रस्तावित केलेले कमीतकमी दर दि.०१.०४.१९९९ पासून लागू करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

२. दि.०१.०७.२००० पासून दरवर्षी पाणीपट्टीचे दर वाढवितांना ग्राहक निर्देशांकाप्रमाणे झालेली भाववाढ विचारात घ्यावी व त्यानुसार केलेली दरवाढ किमान १०% पेक्षा कमी असू नये.

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे



कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

३. विहीत दिनांकानंतर पाणीपट्टी भरल्यास देय पाणीपट्टीच्या रकमेच्या २% विलंब शुल्क आकारण्यात येईल.

४. सर्व सिंचन विकास महामंडळामध्ये दरांच्या बाबतीत एक वाक्यता असावी या दृष्टीने हेच दर इतरही महामंडळाच्या कार्यक्षेत लागू करण्याची शिफारस संबंधित महामंडळांना करण्यात यावी.''

ठराव क्र. १६/८

''ठराव करण्यात येतो की, थर्ड इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कॉन्फरन्सचे आयोजन औरंगाबाद येथे करण्यासाठी, सीबीआयपी नवी दिल्ली, या संस्थेस रु.१.५० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.''

ठराव क्र. १६/९

''महामंडळाच्या सध्याच्या निविदेतील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता नसल्याने, प्रस्तावित केलेला ठराव क्र.१६/९ नामंजूर करण्यात येत आहे.''

ठराव क्र.१६/१०

''ठराव करण्यात येतो की, कुकडी प्रकल्पांतर्गत कर्जत शाखा कालवा किमी ११ ते ३० व निमगाव चारीचे काम जर महामंडळाने ठरविलेल्या प्राधान्यक्रमानुसार विहीत केलेल्या Minimum Programme मध्ये समाविष्ट असेल तरच मा. अध्यक्षांच्या सहमतीने हाती घेण्याचे अधिकार मा. कार्यकारी संचालक यांना देण्यात येत आहेत.''

ठराव क्र.१६/११

''ठराव करण्यात येतो की, ज्या कामांच्या प्रगतीवर महामंडळ स्तरावरील अपरिहार्य अडचणींमुळे (उदा. निधीची पुरेशी उपलब्धता) प्रतिकूल परिणाम झाला आहे अशाच कामांसाठी निविदा शर्तीमध्ये तरतूद केल्याप्रमाणे एका मुदतवाढी व्यतिरिक्त आणखी एक मुदतवाढ मान्यतेअधीन मंजूर करण्याचे अधिकार कार्यकारी समितीस देण्यात येत आहेत.

निविदेतील मुदतवाढीबाबतच्या तरतुदींबाहेर जाऊन अशी मुदतवाढ देताना निविदेत कलम-२अ अंतर्गत असलेली प्रोत्साहनाची तरतूद मुदतवाढ दिलेल्या प्रकरणी लागू रहाणार नाही.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म. पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. १६/१२

''ठराव करण्यात येतो की, श्री. प्र.ना. बेहेरे, निवृत्त न्यायाधीश यांची महामंडळाचे कायदे सल्लागार म्हणून दि.०१.०१.९९ ते ३१.१२.९९ या कालावधीसाठी नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून पुढील बैठकीमध्ये श्री. बेहेरे यांनी केलेल्या कामकाजाचा आढावा नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर करण्यात यावा.''

ठराव क्र. १६/१३

''ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने मार्च ९८ मध्ये शासन हमीवर युनायटेड वेस्टर्न बँकेकडून घेतलेल्या रु.६० कोटीच्या अल्पमुदतीच्या कर्जाची मुदत दि.३१.०३.९९ पर्यंत वाढविण्यास व त्याची परतफेड करुन महामंडळास पुन्हा रु.६० कोटी युनायटेड वेस्टर्न बँकेकडून अल्पमुदतीचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१६/१४

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाने कॅनरा बँकेकडून घेतलेल्या रु.१२० कोटींच्या अल्पमुदतीच्या कर्जाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१. सध्याच्या शासन हमीवर घेतलेल्या रु.६० कोटी कर्जाची मुदत दि.३१.०३.९९ पर्यंत वाढविणे. त्या कर्जाची परतफेड करणे व नव्याने रु.६० कोटींचे अल्पमुदत कर्ज शासन हमीवर घेणे.

२. महामंडळाकडील बिगर महसुली ठेवींच्या तारणावर घेतलेल्या रु.६० कोटींच्या अल्पमुदत कर्जाची मुदत दि.३१.०३.२००० पर्यंत वाढविणे.''

ठराव क्र.१६/१५

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या कार्यक्षेत उद्भवणाऱ्या विविध न्यायालयीन प्रकरणांबाबत वकीलांची फी ठरविणे तसेच सल्ला फी ठरविणे यासंदर्भात राज्य शासनाच्या न्याय व विधी खात्याचा सल्ला घेण्यात यावा. महामंडळाने प्रस्तावित केलेल्या वकीलांच्या फी चा प्रस्ताव, राज्य शासनाच्या विधी व न्याय खात्याची सहमती घेऊन नियामक मंडळास फेर सादर करावा.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११.

ठराव क्र. १६/१६

''ठराव करण्यात येतो की, १९९७-९८ या आर्थिक वर्षाच्या रु. ५६१६.३२ कोटींच्या ताळेबंदास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१६/१७

''ठराव करण्यात येतो की, उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेला किमान कार्यक्रम पूर्ण करण्याच्या अनुषंगाने सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाच्या रु.४१३५ कोटी अंदाजित खर्चाच्या अर्थसंकल्पास नियामक मंडळाची मंजुरी देण्यात येत आहे. या अर्थसंकल्पास शासनाची मान्यता घेण्यात यावी, तसेच कामाच्या प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेऊन उद्दिष्टपूर्तीसाठी आखलेल्या किमान कार्यक्रमानुसार संनियंत्रण (Monitoring) करण्यात यावे.''

ठराव क्र. १६/१८

''ठराव करण्यात येतो की, राज्य शासनाच्या सूचनेनुसार महाराष्ट्र भूविकास महामंडळाने जे कर्मचारी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविले आहेत, त्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती परिशिष्ट क्र. ८ मधील अ.क्र. १ ते ९ प्रमाणे ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

ठराव क्र.१६/१९

''ठराव करण्यात येतो की, १९९८-९९ या आर्थिक वर्षामध्ये काढलेल्या कर्जरोख्यांच्या मालिका-४ साठी करावा लागणारा खर्च (आवर्ती खर्चासह) यापोटी रु.१२७.१७ कोटी खर्च करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत असून हा खर्च करण्याचे अधिकार कार्यकारी संचालकांना देण्यात येत आहेत. वरील खर्चाचा तपशील परिशिष्ट क्र.९ प्रमाणे राहील.''

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे



DIR_MEET_16_resolution

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

**कालव्यावरील प्रवाही पाणी वापरासाठी निरनिराळया हंगामातील निरनिराळया पिकांसाठी सिंचनाचे सुधारित पाणीपट्टीचे दर**

## परिशिष्ट क्र. १

## निरनिराळया हंगामातील निरनिराळया पिकांचे प्रवाही/ठिबक सिंचनावरील पाणीपट्टीचे दर

( पाणीपट्टीचे दर प्रति हेक्टरी )

| अ.क्र. | पिकाचे नाव अगर हंगाम | १.७.९४ पासूनचे दर | मोठया, मध्यम व लघु प्रकल्पावरील किमान दर | |
|---|---|---|---|---|
| | | | * ०१/०७/१९९८ पासून | ०१/०७/१९९९पासून |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| अ) | **खरीप हंगाम ( प्रवाही )** | | | |
| १ | खरीप हंगामी (संकरित धरून) | १०० | १५० | १६५ |
| २ | खरीप भात (क्यारनाम्यावर) | १०० | १५० | १६५ |
| ३ | खरीप भात (मागणीनुसार) | २०० | ३०० | ३३० |
| ४ | खरीप भुईमुग | २०० | ३०० | ३३० |
| ५ | आगाऊ पाणी (खरीपमध्ये रब्बी पिकांसाठी) | ५० | ७५ | ८५ |
| ६ | संकरित बियाणे आणि खरीपातील | २०० | ३०० | ३३० |
| | आधारभूत पिके | | | |
| ब) | **रब्बी पिके ( प्रवाही )** | | | |
| ७ | रब्बी हंगामी (गहु आणि भुईमुग सोडून) | १५० | २२५ | २५० |
| ८ | रब्बी गहू | २०० | ३०० | ३३० |
| ९ | खरीप आणि रब्बी कपाशी | ३०० | ४५० | ५०० |
| १० | रब्बी भुईमुग | ३०० | ४५० | ५०० |
| ११ | रब्बी आणि उन्हाळी भात | ३०० | ४५० | ५०० |
| १२ | संकरित बियाणे आणि रब्बीमधील | ३०० | ४५० | ५०० |
| | आधारभूत पिके | | | |
| १३ | मागास पाणी | ५० | ७५ | ८५ |
| | (रब्बीमध्ये खरीप पिकांना दिलेले पाणी) | | | |
| १४ | उन्हाळी हंगामी | ३०० | ४५० | ५०० |
| १५ | उन्हाळी भुईमुग | ६०० | ९०० | १००० |
| १६ | उन्हाळी कपाशी (१ एप्रिल पासून) | ६०० | ९०० | १००० |
| १७ | उन्हाळी कपाशी (१ मार्च पासून) | ८०० | १२०० | १३२० |
| १८ | आगाऊ पाणी | १५० | २५० | २७५ |
| | (उन्हाळी हंगामात देलेले १ पाणी) | | | |
| १९ | मागास पाणी | ७५ | १५० | १६५ |
| | (उन्हाळी हंगामामध्ये रब्बी पिकांना | | | |
| | दिलेले १ पाणी) | | | |
| क) | **दुहंगामी पिके ( प्रवाही )** | | | |
| २० | दुहंगामी उदा. तूर, बटाटा, इत्यादी | | | |
| १ | खरीप आणि रब्बीमध्ये | १५० | २२५ | २५० |
| २ | रब्बी आणि उन्हाळयामध्ये | २५० | ४०० | ४४० |
| ड) | **बारमाही अ) प्रवाही** | | | |
| २१ | ऊस | १७५० | २७०० | ३००० |
| २२ | केळी | १७५० | २७०० | ३००० |
| २३ | **इतर बारमाही** | | | |
| १ | फळझाडे, लुसर्न गवत इ. | १७५० | २७०० | ३००० |
| २ | शुगर बीट | ३०० | ४५० | ५०० |
| | (आगाऊ आणि मागास दिलेले पाणी वगळून) | | | |

* **हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

( पाणीपट्टीचे दर प्रति हेक्टरी )

| अ.क्र. | पिकाचे नाव अगर हंगाम | १.७.९४ पासूनचे दर | मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पावरील किमान दर | |
|---|---|---|---|---|
| | | | * ०१/०७/१९९८ पासून | ०१/०७/१९९९पासून |
| ३ | खरीपातील भाजीपाला | २०० | ३०० | ३३० |
| ४ | रब्बीतील भाजीपाला | ३०० | ४५० | ५०० |
| ५ | उन्हाळी हंगामातील भाजीपाला | ७५० | ११२५ | १२५० |
| ६ | खरीप आणि रब्बी मधील कांदे | ५०० | ७५० | ८२५ |
| ७ | खरीप आणि रब्बी मधील एक मागास पाणी दिलेले कांदे | ५५० | ८२५ | ९१० |
| ८ | खरीप आणि रब्बी कांदे आणि उन्हाळी हंगामात एकापेक्षा जास्त पाणी दिलेले | ७०० | १०५० | ११६० |
| ९ | रब्बी आणि उन्हाळी हंगामी कांदे | ८०० | १२०० | १३२० |
| २४ | बागायत | | | |
| १ | अडसाली डिसेंबर पर्यंत प्रत्येक महिन्यात | | | |
| | खरीप | ८५ | १३० | १५० |
| | रब्बी | १४५ | २२० | २५० |
| २ | अडसाली जानेवारीमध्ये | ३५० | ५२५ | ६०० |
| ३ | अडसाली फेब्रुवारीमध्ये | ३८० | ५७० | ६३० |
| ४ | अडसाली मार्चमध्ये | ६६० | ९९० | ११०० |
| ५ | अडसाली एप्रिलमध्ये | ८२० | १२३० | १३६० |
| ६ | सुरू फेब्रुवारीपर्यंत प्रत्येक महिन्यात | १४५ | २२० | २५० |
| ७ | सुरू मार्चमध्ये | ५०० | ७५० | ८२५ |
| ८ | सुरू एप्रिलमध्ये पीक समुहाचे दर | ५८० | ८७० | ९६० |
| २५ | ऊस ब्लॉक १:४ | ५७५ | ८६५ | १००० |
| २६ | फ्रुट ब्लॉक | १७५० | २६२५ | २९०० |
| २७ | गार्डन ब्लॉक | ६८० | १०२० | ११२५ |
| २८ | गार्डन सिवनल ब्लॉक | ७३० | १०९५ | १२१० |
| २९ | तीन हंगामी ब्लॉक | २५० | ३७५ | ४१५ |
| ३० | दुहंगामी ब्लॉक | २५० | ३७५ | ४१५ |
| ३१ | रब्बी ब्लॉक | १७५ | २६५ | २९० |
| | बारमाही ब) ठिबक | | | |
| ३२ | ऊस | १७५० | १७५० | १९२५ |
| ३३ | केळी | १७५० | १७५० | १९२५ |
| ३४ | इतर बारमाही | | | |
| १ | फळझाडे, लुसर्न गवत इ. | १७५० | १७५० | १९२५ |
| २ | शुगर बीट (आगाऊ आणि मागास दिलेले पाणी वगळून) | ३०० | ३०० | ३३० |
| ३ | खरीपातील भाजीपाला | २०० | २०० | २२० |
| ४ | रब्बीतील भाजीपाला | ३०० | ३०० | ३३० |
| ५ | उन्हाळी हंगामातील भाजीपाला | ७५० | ७५० | ८२५ |
| ६ | खरीप आणि रब्बी मधील कांदे | ५०० | ५०० | ५५० |
| ७ | खरीप आणि रब्बी मधील एक मागास पाणी दिलेले कांदे | ५५० | ५५० | ६१० |
| ८ | खरीप आणि रब्बी कांदे आणि उन्हाळी हंगामात एकापेक्षा जास्त पाणी दिलेले | ७०० | ७०० | ७७० |
| ९ | रब्बी आणि उन्हाळी हंगामी कांदे | ८०० | ८०० | ८८० |

* हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

( पाणीपट्टीचे दर प्रति हेक्टरी )

| अ.क्र. | पिकाचे नाव अगर हंगाम | १.७.९४ पासूनचे दर | मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पावरील किमान दर | |
|---|---|---|---|---|
| | | | * ०१/०७/१९९८ पासुन | ०१/०७/१९९९पासुन |
| ३५ | बाढावा | | | |
| १ | अडसाळी डिसेंबर पर्यंत प्रत्येक महिन्यात | | | |
| | खरीप | ८५ | ८५ | ९५ |
| | रब्बी | १४५ | १४५ | १६० |
| २ | अडसाळी जानेवारीमध्ये | ३५० | ३५० | ४०० |
| ३ | अडसाळी फेब्रुवारीमध्ये | ३८० | ३८० | ४३० |
| ४ | अडसाळी मार्चमध्ये | ६६० | ६६० | ७२५ |
| ५ | अडसाळी एप्रिलमध्ये | ८२० | ८२० | ९०० |
| ६ | सुरू फेब्रुवारीपर्यंत प्रत्येक महिन्यात | १४५ | १४५ | १६० |
| ७ | सुरू मार्चमध्ये | ५०० | ५०० | ५५० |
| ८ | सुरू एप्रिलमध्ये पीक समुहाचे दर | ५८० | ५८० | ६५० |
| ३६ | ऊस ब्लॉक १:४ | ५७५ | ५७५ | ६४० |
| ३७ | फ्रुट ब्लॉक | १७५० | १७५० | १९५० |
| ३८ | गार्डन ब्लॉक | ६८० | ६८० | ७५० |
| ३९ | गार्डन सिजनल ब्लॉक | ७३० | ७३० | ८१० |
| ४० | तीन हंगामी ब्लॉक | २५० | २५० | २७५ |
| ४१ | दुहंगामी ब्लॉक | २५० | २५० | २७५ |
| ४२ | रब्बी ब्लॉक | १७५ | १७५ | १९५ |
| ई) | सांडपाण्यावरील पाणीपट्टीचे दर | | | |
| ४३ | ऊस | ३२५० | ४८७५ | ५४०० |
| ४४ | इतर बारमाही | २७५० | ४१२५ | ४६०० |
| ४५ | खरीप हंगामी | २०० | ३०० | ३३० |
| ४६ | रब्बी हंगामी | ३०० | ४५० | ५०० |
| ४७ | गहू | ४२५ | ६४० | ७१० |
| ४८ | उन्हाळी पिके | ७५० | ११५० | १३०० |
| ४९ | भात (दुसवटा) | ७५० | ११५० | १३०० |
| ५० | कपाशी | १०५० | १६०० | १८०० |
| ५१ | भुईमुग | १०५० | १६०० | १८०० |

* हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत

मा. मंत्री (म.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

परिशिष्ट क्रमांक -२

घनमापन पध्दतीवर कालव्यातून / पाणी वापरदाराच्या निधीतून बांधलेल्या जलशयातून पाणी पुरवठा करताना आकारावयाचे पाणीपट्टीचे स्वामित्व शुल्काचे दर.

(रू.प्रति सहस्त्र घनमीटर)

| अ.क्र. | स्थळ | हंगाम | १.७.९४ पासून दर | * ०१/०७/१९९८ पासून दर | ०१/०७/९९ पासून दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | कालव्यातून मायनरच्या मुखाशी (पाणीपट्टी) | खरीप | २० | २० | २२ |
| | | रब्बी | ३० | ३० | ३३ |
| | | उन्हाळी | ६० | ६० | ६६ |
| २ | कालव्यातून बारे जवळ (पाणीपट्टी) | खरीप | २२ | २२ | २४ |
| | | रब्बी | ३३ | ३३ | ३६ |
| | | उन्हाळी | ६६ | ६६ | ७२ |
| ३ | पाणी वापर दाराकडून जलाशय बांधले असताना (स्वामित्व शुल्क) | सर्व हंगामासाठी | १० | १० | ११ |

टीपः १. मायनरवर घनमापन पध्दतीने शासकीय नियमाप्रमाणे पाणी घेणाऱ्या सहकारी संस्थाना जर त्या संस्था इतर कोठल्याही योजनेखाली व्यवस्थापनासाठी अर्थसहाय (मॅनेजमेंट सबसिडी) घेत नसतील त्यांनी वरीलप्रमाणे पाणीपट्टी दिल्यानंतर पाणीपट्टीच्या २० टक्के इतके अर्थसहाय लगेच देण्यात येईल व हे अर्थ सहाय प्रतिपूर्तीच्या स्वरूपात नसून प्रत्यक्ष राहील.

२. पाणी वापर संस्थानी घनमापन पध्दतीवर आकारलेली पाणीपट्टीची देयके निर्धारित दिनांकापर्यंत भरल्यास, देयकाच्या मूळ रकमेवर (लोकल सेस सोडून) ५ टक्के सूट देण्यात येईल. तसेच वरील (१) प्रमाणे २० टक्के अर्थसहायही मूळ रकमेवरव देण्यात येईल.

* हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

## परिशिष्ट क्रमांक - ३/१

## उपसा सिंचनावरील पाणीपट्टीचे दर - ०१.०७.१९९८ पासून लागू

## (खाजगी उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापराबद्दल)

(रूपये प्रती हेक्टर)

| अ. क्र. | उपसा सिंचनाचे ठिकाण | उस व केळी पिकांसाठी दर | | | इतर बारमाही पिकांसाठी दर | | | खरीप पिकांसाठीचे दर | | रब्बी पिकांसाठीचे दर | | उन्हाळी पिकांसाठीचे दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित * | | १.७.९४ पासूनचे | प्रस्तावित * | | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित * | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित * | १.७.९४ पासून दर | प्रस्तावित * |
| | | | पाटाचे | ठिबक सिंचन | | पाटाचे | ठिबक सिंचन | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १ | कालवा | ७५० | २७०० | १७५० | ५०० | २७०० | १७५० | ५० | १५० | ७५ | २२५ | १५० | ४५० |
| २ | जलाशय | ३७५ | १३५० | ९०० | २५० | १३५० | ९०० | २५ | ७५ | ३७.५ | १२० | ७५ | २२५ |
| ३ | धरण व उंचावणीचा बंधारा | ३७५ | १३५० | ९०० | २५० | १३५० | ९०० | २५ | ७५ | ३७.५ | १२० | ७५ | २२५ |
| ४ | उंचावणीचा बंधारा | ३७५ | १३५० | ९०० | २५० | १३५० | ९०० | २५ | ७५ | ३७.५ | १२० | ७५ | २२५ |
| ५ | लाभक्षेत्र मर्यादेमधील नदी | १८७.५ | ६६० | ४५० | १२५ | ६६० | ४५० | १२.५ | ४० | २० | ६० | ३७.५ | १२० |
| ६ | बंधाऱ्याच्या (फुगवटा) क्षेत्रात परंतु जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही | १८७.५ | ६६० | ४५० | १२५ | ६६० | ४५० | १२.५ | ४० | २० | ६० | ३७.५ | १२० |
| ७ | नदी नाल्यावरील पहिला बंधारा किंवा धरणाच्या पलिकडील भागातून उपसा सिंचन | ६२.५ | २२० | १५० | ४० | २२० | १५० | निरंक | निरंक | १२.५ | २० | १२.५ | ४० |
| ८ | खरीपातील वळवणीचा बंधारा | ६२.५ | २२० | १५० | ४० | २२० | १५० | निरंक | निरंक | १२.५ | २० | १२.५ | ४० |

अ) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून, नदीतून पाणी उचलून वाढवा धरून उस बागायतीसाठी करण्यात आलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांच्या पाणी वापराबद्दलचे पाणीपट्टीचे दर (लागण केल्यापासून पीक निघेपर्यंत) खालील प्रमाणे असतील.

१. अधिसूचित नद्या की, जेथे धरणाच्या पाण्याच्या साठ्यामधून बारमाही पाणी सोडण्यात येते.

२. ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत, अशा नद्यांवर जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही

३. ज्या ठिकाणी साठवणीचा फायदा नाही अशा नदीतून.

दर रूपये प्रति हेक्टर

| १.७.९४ पासून दर | प्रस्तावित * | |
|---|---|---|
| | प्रवाही | ठिबक |
| ४६८.७५ | १७०० | ११०० |
| २३५ | ८५० | ५५० |
| ७५ | ३०० | २०० |

* हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष

म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,

म.कृ.खो.वि.म.पुणे

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे. ( परिशिष्ट क्रमांक - ३/२ )

## उपसा सिंचनावरील पाणीपट्टीचे दर - ०१.०७.१९९९ पासून लागू

### (खाजगी उपसा सिंचन योजनेच्या पाणी वापराबद्दल)

(रूपये प्रती हेक्टर)

| अ.क्र. | उपसा सिंचनाचे ठिकाण | उस व केळी | | इतर बारमाही | | खरीप पिके | रब्बी पिके | उन्हाळी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रवाही | ठिबक सिंचन | प्रवाही | ठिबक सिंचन | | | |
| | | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | २ | | | | | | | |
| १ | कालवा | ३००० | २००० | ३००० | २००० | १७० | २५० | ५०० |
| २ | जलाशय | १५०० | १००० | १५०० | १००० | ९० | १२५ | २५० |
| ३ | धरण व उंचावणीचा बंधारा | १५०० | १००० | १५०० | १००० | ९० | १२५ | २५० |
| ४ | उंचावणीचा बंधारा | १५०० | १००० | १५०० | १००० | ९० | १२५ | २५० |
| ५ | लाभक्षेत्र मर्यादेमधील नदी | ७२५ | ५०० | ७२५ | ५०० | ५० | ७० | १२५ |
| ६ | बंधाऱ्याच्या (फुग्याच्या) क्षेत्रात परंतु जेथे वरील धरणातून पाणी सोडण्यात येत नाही | ७२५ | ५०० | ७२५ | ५०० | ५० | ७० | १२५ |
| ७ | नदी नाल्यावरील पहिला बंधारा किंवा धरणाच्या पलिकडील भागातून उपसा सिंचन | २४० | १६० | २४० | १६० | १५ | २० | ४० |
| ८ | खरीपातील वळवणीचा बंधारा | २४० | १६० | २४० | १६० | १५ | २० | ४० |

अ) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यातून, नदीतून पाणी उचलून वाढवा धरून उस बागायतीसाठी करण्यात आलेल्या खाजगी उपसा सिंचन योजनांच्या पाणी वापराबद्दलचे पाणीपट्टीचे दर (लागण केल्यापासून पीक निघेपर्यंत) खालील प्रमाणे असतील.

| | (दर रूपये प्रति हेक्टर) प्रवाही | ठिबक |
|---|---|---|
| १. अधिसूचित नद्या की, जेथे धरणाच्या पाणाच्या साठ्यामधून बारमाही पाणी सोडण्यात येते - | १९०० | १२०० |
| २. ज्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचे बंधारे आहेत, अशा नद्यांवर जेथे वरील धरणातून पाणी - सोडण्यात येत नाही. | ९५० | ६०० |
| ३. ज्या ठिकाणी साठवणीचा फायदा नाही अशा नदीतून - | ३५० | २२० |

* **हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.** (परिशिष्ट क्र.४)

**सिंचन विकास महामंडळाच्या अधिपत्याखालील**

**३० मीटर खालील उपसा सिंचन योजनावरील सेवा शुल्काचे दर (रूपये प्रती हेक्टर)**

| अ.क्र. | | हंगाम व पिकाचे नांव | १.७.९४ पासून दर | १.७.१९९८ पासून दर * | १.७.१९९९ पासून दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | **दुहंगामी पिके** | | | |
| | १ | तूर | २०० | ३०० | ३३० |
| | २ | हळद | २७५ | ४२५ | ४५५ |
| | ३ | मिरची | २७५ | ४२५ | ४५५ |
| | ४ | लांबधागा कपाशी व भुईमूग (उन्हाळी व खरिप) | ५०० | ७५० | ८२५ |
| २ | | **बारमाही पिके (प्रवाही)** | | | |
| | १ | ऊस | १५०० | २२५० | २५०० |
| | २ | केळी | १५०० | २२५० | २५०० |
| | ३ | इतर बारमाही पिके | १०३७ | १६०० | १७५० |
| | ४ | वाढीव ऊस व केळी पिकाचा एक पाण्याचा दर | ५० | ७५ | ९० |
| ३ | | **बारमाही पिके (ठिबक)** | | | |
| | १ | ऊस | १५०० | १५०० | १६५० |
| | २ | केळी | १५०० | १५०० | १६५० |
| | ३ | इतर बारमाही पिके | १०३७ | १०५० | ११५० |
| | ४ | वाढीव ऊस व केळी पिकाचा एक पाण्याचा दर | ५० | ५० | ६० |
| ४ | | **खरीप पिके** | | | |
| | १ | साळ (धान्य) | १५० | २२५ | २५० |
| | २ | इतर अन्नधान्य व चाऱ्याची पिके | १२५ | १९० | २१० |
| | ३ | इतर नगदी पिके | १७५ | २०० | २२० |
| ५ | | **रब्बी पिके** | | | |
| | १ | गहू | २२५ | ३४० | ३८० |
| | २ | इतर अन्नधान्य व चाऱ्याची पिके | १५० | २२५ | २५० |
| | ३ | इतर नगदी पिके | ३५० | ५२५ | ५८० |
| ६ | | **उन्हाळी पिके** | | | |
| | १ | उन्हाळी अन्नधान्य | ३०० | ४५० | ५०० |
| | २ | संकरीत ज्वारी | ३०० | ४५० | ५०० |
| | ३ | नगदी पिके | ५०० | ७५० | ८३० |
| | ४ | दुसऱ्या उन्हाळी भात | ३७५ | ५७० | ६२० |
| ७ | | **भाजीपाला** | | | |
| | १ | खरीप | २२५ | ३४० | ३८० |
| | २ | रब्बी | ३५० | ५२५ | ५८० |
| | ३ | उन्हाळी | ५०० | ७५० | ८३० |
| ८ | | **आगाऊ व मागास पाणी (प्रत्येक पाण्यास)** | | | |
| | १ | अन्नधान्य पिकास | ४० | ६० | ७० |
| | २ | नगदी पिकास | ५० | ८० | ९० |

टीप - १. वरील दर हे पाणी उचलण्याचे दर (सेवा शुल्क) असून, सदर दराव्यतिरिक्त अधिसूचित नदी, नाले, ओढे अगर कालवे यामधून घेण्यात येणाऱ्या पाण्यावर शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरा प्रमाणे पाणीपट्टी (परिशिष्ट क्रमांक ३/१ ते ३/६ प्रमाणे) घ्यावेत.

* **हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.** (परिशिष्ट क्र.५)

**सिंचन विकास महामंडळाच्या अधिपत्याखालील**

**३० मीटर वरील उपसा सिंचन योजनावरील सेवा शुल्काचे दर (रूपये प्रती हेक्टर)**

| अ.क्र. | हंगाम व पिकाचे नाव | १.७.९४ पासून दर | १.७.१९९८ पासून दर * | १.७.१९९९ पासून दर |
|---|---|---|---|---|
| | | ३ | ४ | ५ |
| १ | २ | | | |
| १ | **दुहंगामी पिके** | | | |
| १ | तूर | २०५ | ३१० | ३४० |
| २ | हळद | २८५ | ४३० | ४८० |
| ३ | मिरची | २८५ | ४३० | ४८० |
| ४ | लांबधागा कपाशी व भुईमूग (उन्हाळी व खरिप) | ६०० | ९०० | १००० |
| २ | **बारमाही पिके (प्रवाही)** | | | |
| १ | ऊस | १८१२ | २७५० | ३००० |
| २ | केळी | १८१२ | २७५० | ३००० |
| ३ | इतर बारमाही पिके | १२६२ | १९०० | २१०० |
| ४ | वाढीव ऊस व केळी पिकाचा एक पाण्याचा दर | ६२ | १०० | १०५ |
| ३ | **बारमाही पिके (ठिबक)** | | | |
| १ | ऊस | १८१२ | १८२० | २००० |
| २ | केळी | १८१२ | १८२० | २००० |
| ३ | इतर बारमाही पिके | १२६२ | १२८० | १४०० |
| ४ | वाढीव ऊस व केळी वाढीव ऊस व केळी | ६२ | ७० | ७० |
| ४ | **खरीप पिके** | | | |
| १ | साळ (धान्य) | २२० | ३३० | ३७० |
| २ | इतर अन्नधान्य व चाऱ्याची पिके | १२५ | १९० | २१० |
| ३ | इतर नगदी पिके | १७५ | २०० | २२० |
| ५ | **रब्बी पिके** | | | |
| १ | गहू | २७५ | ४३० | ४६० |
| २ | इतर अन्नधान्य व चाऱ्याची पिके | १६५ | २५० | २८० |
| ३ | इतर नगदी पिके | ३५० | ५३० | ५८० |
| ६ | **उन्हाळी पिके** | | | |
| १ | नगदी पिके | ६०० | ९०० | १००० |
| २ | दुसपटा उन्हाळी भात | ६९० | १०५० | ११५० |
| ७ | **भाजीपाला** | | | |
| १ | खरीप | २३० | ३५० | ३८० |
| २ | रब्बी | ३५० | ५३० | ६०० |
| ३ | उन्हाळी | ६०० | ९०० | १००० |
| ८ | **आगाऊ व मागास पाणी (प्रत्येक पाण्यास)** | | | |
| १ | अन्नधान्य पिकास | ४० | ६० | ७० |
| २ | नगदी पिकास | ५५ | ९० | १०० |

टीप -

१ वरील दर हे पाणी उचलण्याचे दर (सेवा शुल्क) असून, सदर दराव्यतिरिक्त अधिसूचित नदी, नाले, ओढे अगर कालवे यामधून घेण्यात येणाऱ्या पाण्यावर शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या दरा प्रमाणे पाणीपट्टी (परिशिष्ट क्रमांक ३/१ते३/६ प्रमाणे) घ्यावेत.

* **हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

## परिशिष्ट - ६

## औद्योगिक वापरासाठी सिंचन विकास महामंडळाकडून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे दर (रूपये /१०,००० लिटर)

| अ.क्र. | वापराचा प्रकार | १.७.१९९३ पासून दर | १.७.१९९८ पासून दर * | १.७.१९९९ पासून दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **औद्योगिक वापर** | | | |
| अ) | नदीवर धरण बांधले असल्यास | | | |
| १ | जलाशयातून | ३.०० | ९.०० | १०.०० |
| २ | कालव्यातून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने) | | | |
| अ) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव असल्यास | ६.०० | १८.०० | २०.०० |
| ब) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | ७.५० | २२.५० | २५.०० |
| ३ | नदीतून | | | |
| अ) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव असल्यास | ४.५० | १३.५० | १५.०० |
| ब) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | ७.५० | २२.५० | २५.०० |
| ४ | वापरणाऱ्या संस्थेने धरण स्वखर्चाने बांधले असल्यास किंवा धरणाच्या नियमानुसार पाणी साठ्याच्या प्रमाणात खर्च दिला असल्यास | १.०० | ३.०० | ३.५० |
| ब) | नदीवर पाणी उचलण्याच्या जागेवर कोठेही धरण नसेल तर | | | |
| १ | नदीतून | १.०० | ३.०० | ३.५० |

टीप: औद्योगिक पाणी वापर म्हणजे कारखाने, रेल्वे औष्णिक केंद्र, गिरण्या, खाणी, सघारिम (कॅंडेन्सर) इत्यादीकडून होणारा पाणी वापर.

*** हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म.पुणे

कार्यकारी संचालक,
म.कृ.खो.वि.म.पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.

## परिशिष्ट - ७

## घरगुती वापरासाठी सिंचन विकास महामंडळाकडून पुरवठा होणाऱ्या पाण्याचे दर (रूपये /१०,००० लिटर)

| अ.क्र. | वापराचा प्रकार | १.७.१९९३ पासून दर | १.७.१९९८ पासून दर * | १.७.१९९९ पासून दर |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **घरगुती वापर** | | | |
| अ) | नदीवर धरण बांधले असल्यास | | | |
| १ | जलाशयातून | ०.४० | ०.८० | ०.९० |
| २ | कालव्यातून (प्रवाही अगर उपसा पध्दतीने) | | | |
| अ) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव असल्यास | १.०० | २.०० | २.२० |
| ब) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | १.५० | ३.०० | ३.३० |
| ३ | धरणाखालील नदीतून | | | |
| अ) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव असल्यास | ०.७५ | १.५० | १.७० |
| ब) | मापदंडाप्रमाणे साठवण तलाव नसल्यास | १.५० | ३.०० | ३.३० |
| ४ | वापरणाऱ्या संस्थेने धरण स्वखर्चाने बांधले असल्यास किंवा धरणाच्या प्रमाणानुसार खर्च दिल्यास | ०.२५ | ०.५० | ०.६० |
| ब) | नदीवर पाणी उचलण्याच्या जागेवर कोठेही धरण नसेल तर | | | |
| १ | नदीतून | ०.२५ | ०.५० | ०.६० |

**हे दर १/४/९९ पासुन केल्या जाणा-या आकारणीसाठी वापरण्यात यावेत**

**मा. मंत्री (पा.) व अध्यक्ष**
**म.कृ.खो.वि.म.पुणे**

**कार्यकारी संचालक,**
**म.कृ.खो.वि.म.पुणे**

परिशिष्ट क्र - ८

## महाराष्ट्र भूविकास महामंडळाने त्यांच्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर पाठवितांना विहीत केलेल्या अटी व शर्ती

१. प्रतिनियुक्ती भत्ता देय रहाणार नाही.

२. प्रतिनियुक्तीचा कालावधी २ वर्षे राहील. तो कमी करण्याचा वा वाढविण्याचा अधिकारी महाराष्ट्र भूविकास महामंडळास राहील. तसेच सदर कर्मचारी परत पाठविण्याचा अधिकार महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळास राहील

३. महागाईभत्ता, घरभाडेभत्ता, स्थानिक पूरक भत्ता, पदग्रहण अवधी, बदली प्रवासभत्ता, रजा व रजावेतन, रजा प्रवास सवलत, बोनस इ. राज्य शासनाचे नियमांनुसार अनुज्ञेय राहील.

४. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील अंशदायी भविष्य निर्वाह निधी व निवृत्ती वेतन योजना तसेच वैद्यकीय सवलती वगळता इतर तरतुदीं लागू राहील.

५. राज्य शासनाची गटविमा योजना लागू रहाणार नाही.

६. रजा वेतन अंशदान महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत करण्यात येईल.

७. अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या मूळ वेतन व महागाईभत्ता या रकमेच्या १२% इतकी रक्कम दरमहा कपात करुन महाराष्ट्र भूविकास महामंडळाकडे धनाकर्षाद्वारे जमा करण्यात येईल.

८. अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजनेअंतर्गत जेवढी रक्कम कर्मचाऱ्यांच्या पगारातून भविष्य निर्वाह निधीसाठी वसूल केली जाते. तेवढीच रक्कम महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाने निवृत्ती वेतन अंशदान म्हणून भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करण्यासाठी महाराष्ट्र भूविकास महामंडळास धनाकर्षाद्वारे पाठविण्यात येईल.

९. वैद्यकीय अनुदान म्हणून प्रतिवर्षी रु.५०० महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळामार्फत अदा करण्यात येतील.

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे

मा. मंत्री (प) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
DIR_MEET_16_resolution

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे - ११

परिशिष्ट क्र. ९

### कर्जरोख्याची (मालिका-४ व ५) उभारणी करण्यासाठी लागणारा खर्च

| अ.क्र | [illegible] | खर्च [illegible] |
|---|---|---|
| | अ) कर्जरोखे मालिका-५ बाबत निधी उभारण्यासाठी प्रस्तावित खर्च (आवर्ती खर्चासह) | |
| १ | माहितीपत्रक छपाई, फॉर्म्स छपाई, बॉन्ड सर्टिफिकेटस् व लेटर ऑफ अलॉटमेंट छपाई (निविदासह) इ | २३.५५ |
| २ | रजिस्ट्रार्स फीज | १८.५६ |
| ३ | बँकर्स फीज | ०.५० |
| ४ | प्रमुख आयोजक व आयोजक यांची फी | ४३२ |
| ५ | रेटींग एजन्सी (सर्व्हेलन्ससहीत) | ७९.०० |
| ६ | ट्रस्टीशिप फीज | ४८.०० |
| ७ | लिस्टिंग फीज | २८.८९ |
| ८ | शासनाचे हमी शुल्क (५ वर्षासाठी) | ९६००.०० |
| | एकूण अ: | १०२३०.४१ |
| ब. | मालिका-४ अतिरिक्त खर्च (आवर्ती खर्च) | |
| १ | रेटींग सर्व्हेलन्स फी (४ वर्षांची) | ४१.०० |
| २ | रजिस्ट्रार्स फी (४ वर्षांची) | २२.५० |
| ३ | लिस्टिंग फी (४ वर्षांची) | ७.५५ |
| ४ | शासनाचे हमी शुल्क (४ [illegible]) | २०१६.०० |
| | एकूण ब : | [illegible] |
| | मालिका-४ व मालिका-५ एकूण (अ + ब) | १२७१७.४६ |

टीप :- रु. १२७.१७ कोटी मध्ये रु. १२०.१६ कोटी शासन हमी शुल्क आहे

मा. मंत्री (पा) व अध्यक्ष
म.कृ.खो.वि.म., पुणे
DIR_MEET_16_resolution

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म. पुणे